# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

# Date – 11 November 2024

# Time 01.00 to 01.05 PM

# Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ११ नोव्हेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

देशाचे एकावन्नावे सरन्याधीश म्हणून न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी आज पदभार स्वीकारला. राष्ट्रपती दौपदी मुर्मू यांनी राष्ट्रपती भवनात झालेल्या सोहळ्यात त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज गुजरातमधील वडताल इथल्या श्री स्वामीनारायण मंदिराच्या द्वीशताब्दी सोहळ्यानिमित्त दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून आज संबोधित केलं. देशातून चोरी गेलेल्या मुर्ती परदेशातून परत आणण्यात येत आहेत, असं पंतप्रधान याप्रसंगी म्हणाले. स्वामीनारायण परिवाराने एक लाखाहून अधिक वृक्षारोपण केल्याची माहिती पंतप्रधानांनी दिली.

****

स्वीप या मतदार जनजागृती कार्यक्रमांतर्गत केंद्रीय संचार ब्युरोच्या चित्ररथाला आज छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवण्यात आला. मतदानाची टक्केवारी ७५ ते ८०टक्क्यापर्यंत वाढवण्यासाठी या चित्ररथाचा उपयोग होईल, असं जिल्हाधिकारी म्हणाले.

> ***“आपल्या जिल्हाभरामध्ये मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी या रथाचं आजपासून आपण प्रारंभ करत आहोत. आणि एकही मतदार मतदानापासून वंचित राहू नये यासाठी आपल्याला हा कार्यक्रम राबवायचा आहे. आपल्या जिल्ह्यातल्या विशेषत: शहरातल्या मतदानाची टक्केवारी अतिशय चिंताजनक आहे. आणि भारतीय नागरिक म्हणून प्रत्येकाला ही चिंता वाटली पाहिजे की या पद्धतीने***

***जर मतदानाची टक्केवारी कमी होत गेली तर लोकशाहीला धोका निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही.''***

केंद्रीय संचार ब्युरोचे सहायक संचालक माधव जायभाये यांच्यासह जिल्ह्याचे मतदान जनजागृती विषयी आयकॉन असलेले प्रेषित रुद्रवार, अर्चना गायकवाड, श्रेयस यांची याप्रसंगी उपस्थिती होती. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या शिक्षकांनी मतदान जनजागृती विषयीचे फलक हाती घेऊन घोषणा दिल्या.

****

नंदुरबारमध्येही केंद्रीय संचार ब्युरो आणि निवडणूक आयोगामार्फत पाठवण्यात आलेल्या मतदान प्रचार रथाचा शुभारंभ जिल्हाधिकारी मिताली सेठी यांच्या हस्ते झाला. हा रथ लोकसभेमध्ये ज्या मतदान केंद्रामध्ये कमी मतदान झाले अशा गावांमध्ये जावून मतदारांमध्ये मतदान जनजागृती करणार आहे. या उपक्रमांतर्गत आज मोटारसायकल रॅली काढण्यात आली. रॅलीनंतर विद्यार्थी आणि नागरीकांना मतदानाची शपथ देण्यात आली.

****

धाराशिव इथं अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीनं मतदार जनजागृती यात्रेचा आरंभ आज झाला. मतदारांना मतदानाचं महत्त्व सांगून मतदान करण्याचं आवाहन या यात्रेतून करण्यात येणार आहे. मतदानाचा टक्का वाढावा, नवमतदारांनी लोकशाहीच्या उत्सवात सहभागी व्हावं, हा या यात्रेचा उद्देश आहे. धाराशिव जिल्ह्यातल्या पाच तालुक्यातील 50 गावांमधून जवळपास एक लाख मतदारांपर्यंत ही यात्रा पोहोचणार आहे.

****

पुणे विभागातल्या पुण्यासह १० रेल्वे स्थानकांना ईट राइट स्थानक मानांकन मिळालं आहे. अन्न तयार करण्यापासून ते प्रवाशांना खाण्यासाठी देण्यापर्यंतची प्रक्रिया प्रमाणित पद्धतीनं करण्याचं प्रशिक्षण या स्थानकांतील सर्व खाद्य विक्रेत्यांना देण्यात आलं आहे. प्रवाशांना घरच्या अन्नाप्रमाणे पौष्टिक आणि आरोग्यदायी अन्न मिळावं म्हणून रेल्वे मंत्रालयानं इट राईट इंडियाच्या माध्यमातून रेल्वे स्थानकांना इट राइट स्थानक मानांकन देण्यास सुरुवात केली आहे.

****

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी प्रचारानं वेग घेतला आहे. भाजपनेते, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सकाळी नागपूर दक्षिण पश्चिम मतदारसंघात प्रचाररॅली काढली. शिवसेना नेते, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज जालना जिल्ह्यात

सायंकाळी साडेचार वाजता महायुतीच्या उमेदवारांसाठी प्रचारसभा घेणार आहेत. महाविकास आघाडीतील ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या आज धुळे आणि जळगाव जिल्ह्यात प्रचारसभा आयोजित करण्यात आल्या आहेत.

महायुती सरकारपेक्षा काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसच्या सरकारनं हमीभाव आणि शेतकरी कर्जमाफी या दोन्ही बाबी अधिक योग्य पद्धतीनं दिल्या असल्याचं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या. त्या आज पुण्यात प्रसारमाध्यमांशी बोलत होत्या.

****

मुंबईत दहिसर पश्चिम विधानसभा मतदारसंघामध्ये निवडणूक आयोगाच्या पथकानं आज १ कोटी ४३ लाख रुपये किमतीचं जवळपास १ किलो ९५ ग्रॅम सोनं जप्त केलं. निवडणूक अधिकारी शीतल देशमुख यांच्या मार्गदर्शनात ही कारवाई करण्यात आली.

****

महिलांची आशियाई हॉकी अजिंक्यपद स्पर्धा आजपासून बिहारमधल्या राजगीर इथं सुरु होत आहे. मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या हस्ते या स्पर्धेचं उद्घाटन होणार आहे. जपान आणि कोरिया संघात थोड्याच वेळात उद्घाटनाचा सामना सुरु होणार आहे. या स्पर्धेत भारतासह चीन, जापान, मलेशिया, कोरिया और थाईलंड देशांचे संघ सहभागी आहेत. या स्पर्धा २० नोव्हेंबरपर्यंत चालणार असल्याची माहिती बिहार क्रीडा प्राधिकरणचे महासंचालक रवींद्रन शंकरन यांनी दिली.

****

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाकडून ५५व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं गोव्यात आयोजन करण्यात येणार आहे. २०-२८ नोव्हेंबर दरम्यान आयोजित करण्यात येणाऱ्या चित्रपट महोत्सवासंदर्भात आज केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल. मुरुगन, मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांच्या उपस्थितीत दिल्ली इथं पत्रकारपरिषद आयोजित करण्यात आली होती. यंदाच्या महोत्सवासाठी ऑस्ट्रेलिया या देशाची फोकस कंट्री म्हणून निवड करण्यात आली आहे. ऑस्ट्रेलियाचे चित्रपट निर्माते फिलीप नोयस यांना सत्यजित रे जीवनगौरव पुरस्कारानं सन्मानित करण्यात येणार आहे.

****